कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक -

## <u>प्रेस नोट</u>

## "पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील थकीत मिळकतदारांच्या एकूण ५८ मिळकतींवर जप्ती कारवाई"

पुणे महानगरपालिकेने थकीत कर वसुलीसाठी आता मोठ्या प्रमाणावर विशेष मोहीम हाती घेतली आहे. न्यायालयीन प्रकरणे (कोर्ट केसेस), दुबार मूल्यांकन प्रकरणे तसेच मोबाईल टॉवर वादातील प्रकरणे वगळता, सुमारे *५,५०० कोटी रुपयांची थकबाकी* अद्याप वसूल होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने वसुलीला गती देण्यासाठी *जप्ती मोहीम* सुरू केली असून, *आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सुमारे ५८ मिळकतींना जप्ती नोटीस बजावून त्या सील करण्यात आल्या आहेत*.

महानगरपालिकेने आता विशेषतः मोठ्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रित करून* जप्ती कारवाई सुरू केली आहे. निर्धारित वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून, येत्या काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

आज अखेर मिळकतकरापोटी र.रु. २६०४ कोटी मनपा तिजोरीत जमा झाले असून गत वर्षी र.रु. २००७ कोटी भरणा झाला होता. या वर्षी गत वर्षीच्या तुलनेत सुमारे र.रु.६०० कोटी अधिकचा भरणा जमा झाला आहे.

थकबाकीदारांनी स्वयंस्फूर्तीने थकीत कर भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

03.2.26

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका